| MHKO160002782023 | रे.क.नं.३८/२०२३ मधील नि.२६ खालील आदेश |
|---|---|

१. प्रतिवादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चा नियम ३९, आदेश १,२ व सह १५१ प्रमाणे तूर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी प्रतिदावा मिळकतीचे वर्णन प्रतिदाव्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे, त्या मिळकतीला यापुढे सोईकरीता प्रतिदावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे.

२. प्रतिवादीं यांचे अर्जाची थोडक्यात हकिकत अशी की,

प्रतिदावा मिळकत ही त्यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे, त्या मिळकतीमध्ये ते शांततामय कब्जेवहिवाट करीत आलेले आहेत. वादी यांचा सदर प्रतिदावा मिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नाही. वादीं हे गुंड प्रवृत्तीचे इसम असून ते प्रतिवादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा मार्च २०२३ पासून प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादीं हे प्रतिदावा मिळकतीत पिके घेत आहेत. प्रतिवादीं हे साधे इसम आहेत. प्रतिवादीं क्र.१ हे नोकरीसाठी बाहेरगावी असतात, प्रतिवादी क्र.२ हे वयोवृध्द असल्याने वादी हे स्वतः व गुंड इसमांद्वारे प्रतिवादींना त्रास देत आहेत. त्यामुळे प्रतिवादींनी सदरचा प्रतिदावा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे व त्यामध्ये त्यांनी सदरचा अर्ज तूर्तातूर्त मनाईसाठी दाखल करून तो मंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादीं यांनी नि.२७ वर त्यांचे म्हणणे दाखल करून प्रतिदाव्यातील सदर अर्जातील मजकूर पूर्णपणे नाकारलेला आहे. सदर वादीं यांनी कथन केले की प्रतिदाव्यातील गट क्र १३० हा प्रतिवादींचा असून त्यामध्ये वादींनी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा प्रतिवादींना केलेला नाही. प्रतिवादीं हे गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत. प्रस्तुत दाव्यातील मुळ वादीं या महिला वयोवृध्द असून त्या दावा मिळकतीजवळ राहात नसून त्या कायमपणे कोल्हापूर, बेळगाव इ. ठिकाणी राहाण्यास असतात. त्यामुळे त्यांनी प्रतिवादींना कधीही त्रास दिलेला नाही. प्रतिवादीं यांचे विरूध्द वादींनी यापूर्वीच मनाईची दाद मागणी केली होती. मुळ दाव्यात नमूद केलेल्या दावा मिळकतीमध्ये घुसखोरी व अतिक्रमण करून हरकत केल्यामुळे वादींनी

मुदतीत प्रतिवादीविरूध्द दावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी लेखी कैफियत दाखल केली. त्यामध्ये मुळ वादींना प्रतिवादींना केलेल्या तथाकथित हरहरकतीबाबत काहीच व कधीही वाच्यता केलेली नाही. मुळ दाव्यातील नि.५ हा गुणदोषावर चालून मंजूर झालेला आहे. त्यानंतर वादींनी नि.१८ वर सरतपासाचे शपथपत्र नि.२० वर व साक्षीदाराचे शपथपत्र दाखल केलेले आहे. मुळ दाव्यातील दावा मिळकत गट क्र १३१/अ बाबत प्लॉट नं २ ते ९ या मिळकतीं वादींनी सन २००४ मध्ये प्रस्तुत प्रतिवादीं यांचेकडून तत्कालिन बाजारभावाने योग्य तो मोबदला देऊन नोंदणीकृत खरेदीपत्राने विकत घेतलेल्या आहे. तेव्हापासून वादीची दावा मिळकतींत शांततामय विनाहरकत कब्जेवहिवाट होती व आहे. दि.२२/०४/२०१३ रोजी दावा मिळकतीची रितसर मोजणी वादींनी करून घेतलेली आहे. तसेच मोजणी कर्मचा-यांनी दाखविलेल्या हद्दीनुसार व पूर्वी खरेदीपत्रातील प्रतिवादींनी दाखविलेल्या हद्दीच्या सिमा या एकच आल्या असून सदर सिमांवर वादींनी सिमेंट पोल व तारेचे कुंपण केले होते. तथापि प्रतिवादींनी सदरचे सिमेंट पोल उपटून टाकले व दावा मिळकतीत दांडगाव्याने घुसण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादींचा तुर्तातूर्त अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यामुळे वादींनी सदरचे प्रतिवादींच्या प्रतिदाव्यातील सदरचा तात्पुरता मनाईचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. मी वादीं, प्रतिवादीं यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील वादकथन, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादीं, प्रतिवादीं यांचे परस्परविरोधी वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे, युक्तीवाद या सर्व घटनांवरून प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी सदर मुद्दयांचा निश्कर्ष कारणमिमांसेसह नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस प्रतिवादीं यांचे बाजूने आहे का ? | नकारार्थी. |
| २. | सोईस्कर्तेचा तूला प्रवादीं यांचे बाजूने आहे का? | नकारार्थी. |
| ३. | तूर्तातूर्त मनाई न दिल्यास प्रतिवादीं यांचे नुकसान होणार आहे का ? | नकारार्थी. |
| ४. | आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा -

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता -

५. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, दाव्यातील व प्रतिदाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे व मोजणीच्या नकाशाचे अवलोकन केले. वादींनी नि. ३ लगत अ.क्र.१ ते १० अशी कागदपत्रें दाखल केली आहेत. वादींनी नि. २२ लगत अ.क्र.१ ते ३ अशी कागदपत्रें- फोटो व अन्य कागदपत्रें दाखल केली आहेत. वादींनी त्यांचेतर्फे वटमुखत्यार राजेश शामराव कालेकर यांचे शपथपत्र नि.१८ वर दाखल केले आहे. वादीं यांनी त्यांचेतर्फे साक्षीदार महेंद्र चंद्रकांत वायकूळ यांचे शपथपत्र नि.११ वर दाखल केले आहे. प्रतिवादींनी नि. १५ लगत गट क्र १३१,१३०,१३२ चा मोजणी नकाशा दाखल केला आहे. प्रतिवादींनी नि. ३० लगत अ.क्र.१ व २ अशी कागदपत्रें- मोजणी नकाशा व अन्य कागदपत्रें दाखल केली आहेत.

६. वादीं व प्रतिवादीं हे एकमेकांच्या नकाशावर ठाम नाहीत किंवा त्याबाबत त्यांचे एकमत झालेले नाही. तसेच वादीं व प्रतिवादीं यांच्यामध्ये सहमत नकाशा नाही. यापूर्वी या न्यायालयाने वादींनी मुळ दाव्यात दाखल केलेला तूर्तातूर्त मनाईचा अर्ज वादींच्या बाजूने मंजूर केलेला आहे. त्यामध्ये या न्यायालयाने दाव्याचे अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीं यांना वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाईचा आदेश दि.०८/०६/२०२३ रोजी पारीत केलेला आहे. त्यानंतर प्रतिवादींनी दि.२१/०७/२०२३ रोजी नि.२५ वर सदरचा प्रतिदावा दाखल करून त्यामध्ये नि.२६ वर वादींविरूध्द तात्पुरता मनाईचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यास प्रतिवादीं यांनी प्रतिदाव्यास कारण वादीं यांनी स्वतः व गुंड इसमांच्याद्वारे मार्च २०२३ पासून बेकायदेशीरपणे प्रतिवादी यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे दर्शविलेले आहे. पण प्रतिवादी यांची त्यांची मुळ दाव्यातील लेखी कैफियत दि.०८/०६/२०२३ रोजी दाखल केलेली होती, त्यामध्ये त्यांनी वादीं हे त्यांच्या प्रतिदावा मिळकतींस हरकत अडथळा करीत आहेत याबाबत एक शब्दही कथन केलेला नाही. तसेच प्रतिवादीं यांनी त्यावेळी कोणताही प्रतिदावा दाखल केलेला नाही. यावरून असे सिध्द होते की वादीं यांनी प्रतिवादीं यांच्या प्रतिदावा मिळकतींस कोणतीही हरकत अडथळा केलेला नाही. यावरून असे सिध्द होते की वादीं यांनी प्रतिवादीं यांच्या

प्रतिदावा मिळकतीस असलेल्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केलेला नाही.

७. एकंदरीतपणे, प्रतिवादीं यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही. तसेच, दाव्याचा समतोल हा प्रतिवादींच्या बाजूने नाही. जर प्रतिदाव्यात तुर्तातुर्त मनाई आदेश दिला नाही तर प्रतिवादीं यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून प्रतिवादींनी सकृतदर्शनी केस सिद्ध न केल्यामुळे न्यायालय मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ साठी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाण २६ हा नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश अंतिम दावा व प्रतिदावेच्या निकालावर ठरविण्यात येईल

खुल्या न्यायालयात घोषित.

Digitally signed by AMOL SHRIRAM SHINDE
Date: 2023.10.06 11:50:26 +0530

(अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
शाहुवाडी मलकापूर, जि. कोल्हापुर.

स्थळ- शाहुवाडी
दि.०४/१०/२०२३